नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३२९ Issue - 329 | वार सोमवार दि. २० एप्रिल २०२६ Blow- Monday Date 20 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# भारतात अनेक राज्यांमध्ये उष्णतेची लाट

## विदर्भ, मध्य प्रदेशात कहर, पुढील तीन दिवस पावसाचा सुद्धा इशारा; राज्यात ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले तापमान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशात तीव्र उष्णतेच्या लाट असून अनेक राज्यांमध्ये सूर्य आग ओकत आहे. उत्तर आणि मध्य भारतातील अनेक राज्यांमध्ये तापमान ४० ते ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. दरम्यान, हवामान विभागाने येत्या आठवड्यासाठी हवामानाचा अंदाज वर्तवला असून, पुढील काही दिवसांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. विभागाच्या म्हणण्यानुसार, उष्णतेपासून तत्काळ दिलासा मिळण्याची शक्यता नाही. दुपारी १२ ते ४ या वेळेत लोकांनी घरातच थांबावे, असा सल्लाही देण्यात आला आहे.

मेघगर्जनेसह पावसाची शक्यता

शिवाय, उत्तर भारताच्या तुलनेत दक्षिण भारतातील हवामान थोडे सौम्य राहील. पुढील ७२ तासांत दक्षिण महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक आणि तेलंगणामध्ये मुसळधार पाऊस आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. त्याचप्रमाणे, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगाल यांसारख्या ईशान्येकडील लहा राज्यांमध्ये हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. या पावसामुळे तापमानात घट होऊन या भागांतील लोकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. पंजाब, उत्तर राजस्थान आणि पश्चिम हरियाणामध्ये मेघगर्जनेसह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. तथापि, दिल्ली आणि आसपासच्या मैदानी प्रदेशात कोणताही मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा नाही.



तेव्हा उष्णतेची लाट जाहीर केली जाते

भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) उत्तर, मध्य आणि पूर्व भारतातील अनेक भागांसाठी तीव्र उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी केला. पूर्व उत्तर प्रदेश, पूर्व मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि विदर्भातील काही भागांमध्ये तापमान आधीच ४० ते ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार जेव्हा तापमान सामान्य तापमानापेक्षा किमान ४.५ अंश सेल्सिअसने जास्त होते, तेव्हा उष्णतेची लाट जाहीर केली जाते आणि सध्या अनेक ठिकाणी ही मर्यादा ओलांडली जात आहे. राजस्थान आणि ओडिशामध्येही उष्णतेची लाट शिगेला पोहोचली असून, तापमान सामान्यपेक्षा ४.५ अंशांनी जास्त आहे.

विदर्भ आणि मध्य प्रदेशात सर्वाधिक तीव्र उष्णता

या आठवड्यात विदर्भ, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड हे सर्वात उष्ण प्रदेश राहिले. राजस्थान आणि उत्तर प्रदेशच्या काही भागांमध्येही कडक ऊन आहे. ओडिशा, किनारपट्टीवरील आंध्र प्रदेश आणि पूर्व किनारपट्टीवरील तामिळनाडूमध्ये उष्णता आणि आर्द्रतेमुळे जीवन कठीण झाले आहे. जास्त आर्द्रतेमुळे घामाचे बाष्पीभवन होत नाही, त्यामुळे तापमान प्रत्यक्षात आहे त्यापेक्षा खूप जास्त जाणवते. हवामान विभागाच्या (खचऊ) मते, ही तीव्र उष्णता किमान २२ एप्रिलपर्यंत कायम राहील. पूर्व उत्तर प्रदेशात २० एप्रिलच्या सुमारास काहीसा दिलासा मिळू शकतो, तर विदर्भ आणि मध्य भारतातील तापमान काहीसे लवकर कमी होऊ शकते. राजस्थान आणि ओडिशामध्ये उष्णतेची लाट २२ एप्रिलपर्यंत कायम राहील, तर झारखंडमध्ये २१ एप्रिलपर्यंत कोणताही दिलासा मिळणार नाही. पुढील तीन ते चार दिवसांत मैदानी प्रदेशात दिलासा मिळण्याची कोणतीही आशा नाही.

# तामिळनाडूत भीषण स्फोट; फटाका कारखान्यात २० जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चेन्नई : तामिळनाडूतील विरुधुनगर जिल्ह्यातील फटाका कारखान्यात भीषण स्फोट होऊन मोठी दुर्घटना घडली आहे. या स्फोटात किमान २० जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. कत्तनारपट्टी परिसरात रविवारी झालेला हा स्फोट अत्यंत शक्तिशाली होता. स्फोटानंतर कारखान्याचा मोठा भाग उद्ध्वस्त झाला असून बचाव पथकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केलं आहे. प्राथमिक माहितीनुसार, फटाके निर्मिती करत असताना अचानक झालेल्या स्फोटामुळे संपूर्ण युनिटमध्ये आग पसरली. मोठ्या प्रमाणात ज्वलनशील पदार्थ असल्यामुळे स्फोटाचा परिणाम अधिक भीषण झाला.



सध्या अधिकृतरीत्या २० जणांच्या मृत्यूची पुष्टी झाली असली, तरी काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची गंभीरता लक्षात घेऊन मुख्यमंत्री एम. के. स्टालिन (चघ डींश्रळप) यांनी तातडीने मंत्र्यांना घटनास्थळी पाठवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच प्रशासनाला मदत व बचावकार्य वेगाने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अग्निशमन दल आणि स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी बचावकार्य सुरू ठेवले असून ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

विरुधुनगर जिल्हा हा देशातील फटाका उद्योगाचा मोठे केंद्र आहे. मात्र अशा दुर्घटना वारंवार घडत असल्याने सुरक्षा नियमांचे पालन होत आहे का, यावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# करार न मानल्यास इराणचा वीज प्रकल्प-पूल उद्ध्वस्त करण्याचा ट्रम्प यांचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला नवी धमकी दिली आहे. ट्रम्प यांनी म्हटले आहे की, आमचे प्रतिनिधीमंडळ (सोमवार, २० एप्रिल) पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे जाणार आहे. त्यांनी दावा केला की, त्यांनी एक नवा पारदर्शक आणि न्याय्य करार प्रस्तावित केला आहे. जर इराणने हा करार मान्य केला नाही, तर आम्ही त्यांच्या वीज प्रकल्पांना आणि पुलांना उद्ध्वस्त करू. असं सांगत ट्रम्प यांनी इराणला धमकीवजा इशारा दिला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत सांगितले की, इराणने काल होर्मुज सामुद्रधुनीत गोळीबार केला. हा आमच्या युद्धविराम कराराचा पूर्ण भंग आहे. यातील अनेक गोळ्या एका फ्रेंच जहाजावर आणि ब्रिटनच्या मालवाहू जहाजावर डागण्यात आल्या. हे चांगले नव्हते, बरोबर ना? आमचे प्रतिनिधी पाकिस्तानमधील इस्लामाबाद येथे जात आहेत. ते उद्या संध्याकाळपर्यंत तेथे पोहोचतील, जिथे चर्चा होणार आहे.ते पुढे म्हणाले, इराणने अलीकडेच होर्मुज सामुद्रधुनी बंद करत असल्याची घोषणा केली. हे विचित्र आहे, कारण आमच्या नाकेबंदीमुळे ती आधीच बंद आहे. ते नकळत आमच्याच कामी येत आहेत. हा मार्ग बंद असल्यामुळे त्यांचे दररोज सुमारे ५० कोटी डॉलरचे नुकसान होत आहे.

ट्रम्प यांनी पोस्टमध्ये पुढे लिहिले, अमेरिकेला यामुळे कोणतेही नुकसान होत नाही. उलट अनेक जहाजे अमेरिकेकडे येत आहेत. टेक्सास, लुइझियाना आणि अलास्का येथे तेल भरण्यासाठी ती येत आहेत. हे सर्व आयआरजीसीच्या कृपेने घडत आहे, जे नेहमीच स्वतःला 'शक्तिशाली' दाखवण्याचा प्रयत्न करतात.ते पुढे म्हणाले, आम्ही अतिशय निष्पक्ष आणि न्याय्य करार देत आहोत. मला आशा आहे की ते तो स्वीकारतील. कारण जर त्यांनी तो स्वीकारला नाही, तर संयुक्त राज्य अमेरिका इराणमधील प्रत्येक वीज प्रकल्प आणि प्रत्येक पूल उद्ध्वस्त करेल.

आता नरम भूमिका संपली! ते वेगाने कोसळतील, सहज कोसळतील. जर त्यांनी करार स्वीकारला नाही, तर जे करणे आवश्यक आहे ते करणे माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट असेल. मागील ४७ वर्षांत इराणबाबत जे इतर राष्ट्राध्यक्षांनी करायला हवे होते, ते आता करण्याची वेळ आली आहे.आता इराणच्या हत्या मशीनचा अंत करण्याची वेळ आली आहे.

# दोरीने हात बांधलेल्या अवस्थेत विहिरीतून सख्ख्या बहिणींचे मृतदेह बाहेर काढले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कलबुर्गी : कर्नाटकातील कलबुर्गी जिल्ह्यातील यड्रावी तालुक्यातील इजेरी गावातून एक खळबळजनक घटना समोर आली आहे. दोन सख्ख्या बहिणींचे मृतदेह हात बांधलेल्या स्थितीत एका विहिरीत आढळून आले आहेत. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून, हा घातपात असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १६ आणि १७ वर्षांच्या दोन सख्ख्या बहिणींचे मृतदेह शनिवारी सकाळी गावातीलच एका विहिरीत तरंगताना आढळले. विशेष म्हणजे, या दोन्ही मुलींचे हात दोरीने बांधलेल्या अवस्थेत होते. सकाळी ग्रामस्थ विहिरीकडे गेले असता हा प्रकार उघडकीस आला. आपल्या पोटच्या मुलींची ही अवस्था पाहून पालकांनी घटनास्थळी एकच टाहो फोडला. घटनेची माहिती मिळताच जेवरगी पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक मदतीने मृतदेह विहिरीतून बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. मुलींचे हात बांधलेले असल्याने पोलिसांनी या प्रकरणाचा तपास विविध अंगानी सुरू केला आहे. दोन अल्पवयीन मुलींचा अशा प्रकारे संशयास्पद मृत्यू झाल्याने इजेरी गावात तणावाचे वातावरण आहे. या बहिणींनी असे टोकाचे पाऊल उचलले की त्यांना बळजबरीने विहिरीत ढकलण्यात आले, याचा तपास आता पोलीस करत आहेत. दुसरीकडे, कर्नाटकातील विजयपूर जिल्ह्यातील नागठाण गावात एक विचित्र घटना उघडकीस आली होती. मुलगा तुझ्यासारखा दिसत नाही असे टोमणे गावातील लोकांनी वारंवार मारल्यामुळे जन्मदात्या बापानेच आपल्या सहा वर्षाच्या मुलाला कृष्णा नदीत बुडवून संपवल्याची घटना तब्बल एक महिन्याने उघडकीस आली. सिद्धार्थ मल्लिकार्जुन अरकेरी (६) असे बापाने नदीत बुडवून मारलेल्या दुर्दैवी मुलाचे नाव आहे. १६ मार्चला मुलाला कराडजवळ वडोली गावाजवळ कृष्णा नदीत बुडवून बापाने जीव घेतला. गावातील लोक वारंवार तुझा मुलगा तुझ्या सारखा दिसत नाही म्हणून सतवत असल्याने मल्लिकार्जुन अस्वस्थ झाला होता. मुलाला शाळेत घालून येतो म्हणून मल्लिकार्जुन घरातून मुलाला घेऊन बाहेर पडला. नंतर कराडजवळ वडोलीत नेऊन नदीत मुलाला बुडवून मारले. मुलाला सिंदगी गावातील शाळेत दाखल केले असून तो हॉस्टेलमध्ये राहत असल्याचे मल्लिकार्जुनने घरी आल्यावर सांगितले. एक एप्रिल रोजी सिद्धार्थचा वाढदिवस होता म्हणून पत्नी भाग्यश्रीने मुलाला घरी घेऊन या असा तगादा लावल्यावर मल्लिकार्जुन पळून गेला. त्यामुळे संशय आल्याने पोलिसात तक्रार देण्यात आली.

### भेंडवळच्या घटमांडणीचा अंदाज जाहीर

# जूनमध्ये मुसळधार पाऊस, महापूर येणार; देशाची संरक्षण स्थिती तणावात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा : सुमारे ३७० वर्षांपासूनची असलेली भेंडवळच्या घट मांडण्याची परंपरा आजही कायम आहे. काल अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर सूर्यास्ताच्या वेळी घटमांडणी करण्यात आली व आज सकाळी सूर्योदयावेळी या घटमांडणीचे निरीक्षण करून वर्षभराचे पीक पाणी पाऊस राजकीय व देशाच्या संरक्षण स्थितीबद्दलचे अंदाज जाहीर करण्यात आले. यावेळी भेंडवळ परिसरासह मराठवाडा खानदेश व मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावली. भेंडवळच्या घटमांडणीतून मिळालेल्या अंदाजानुसार शेतकरी वर्षभराचं आपल्या पीक पाण्याचे नियोजन करत असतात. भेंडवळची घटमांडणी ही स्थानिक परंपरा असून अनेक शेतकरी त्यावर विश्वास ठेवत असतात एबीपी माझा मात्र भेंडवळच्या घटमांडणीतून निघालेल्या अंदाजाची पुष्टी करत नाही.

पिकांवर रोगराईचं प्रमाण जास्त असेल. कापूस, तांदूळ पिकाचे उत्पन्न भरपूर. ज्वारी , तूर, मुंग, उडीद, मटकी, जवस, वाटाणा ही पिके सर्वसाधारण असतील. तीळ, बाजरी हे पीक भरपूर येईल. देशाची संरक्षण स्थिती तणावात असेल राजा कायम असेल... देशाची आर्थिक स्थिती मजबूत राहणार नाही. पाऊस जूनमध्ये भरपूर, जुलै सर्वसाधारण, ऑगस्ट, सप्टेंबर कमी असेल... अनेक भागात महापुरामुळे नुकसान होणार.

पर्जन्यमान, पिकांची स्थिती, शेतीमालाचे दर, देशातील राजकीय आणि आर्थिक स्थितीबाबत भेंडवळमध्ये दरवर्षी भविष्यवाणी करण्याची परंपरा आहे. गेल्या ३५० वर्षांपासून या घट मांडणीच्या आधारावर वर्षभराचं राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि हवामानाचं भविष्य वर्तवलं जात आहे. शेती आणि पावसाविषयक निसर्गाचा सूक्ष्म अभ्यास गुढीपाडवा ते अक्षय्य तृतीया या काळात करुन वर्षभराची भाकिते या घट मांडणीत करण्यात येते. ३५० वर्षांपूर्वी महान तपस्वी चंद्रभान महाराज वाघ यांनी ही घट मांडणी सुरु केली होती, आणि आता त्यांचे वंशजही परंपरा कायम ठेवून आहेत.



भेंडवळच्या घटमांडणीची परंपरेनुसार एक विशिष्ट पद्धत आहे. शेतात मध्यभागी खोल खड्डा करुन त्या खड्ड्यात मातीचा घट मांडण्यात येतो. घटात चार मातीची ढेकळे, त्यावर पाण्याने भरलेली घागर आणि घागरीवर पापड, भजा, वडा, सांडोई, कुरडई ठेऊन घटाच्या बाजूला पान सुपारीसह विविध १८ प्रकारची धान्ये मांडली जातात. घटाच्या वर्तुळाकार अठरा धान्ये गहू, ज्वारी, तूर, उडीद, मूग, हरभरा, जवस, तीळ, भादली, करडी मसूर, बाजरी, तांदूळ, अंबाडी, सरकी, वाटाणा ही धान्ये मांडली जातात.

घटामध्ये रात्रभर होणाऱ्या नैसर्गिक बदलाचे पहाटे सूक्ष्म निरीक्षण केले जाते. हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत पाऊस, हवामान, पीक, अर्थव्यवस्था तसेच देशाचे राजकीय तथा नैसर्गिक संकटाबाबत चाहूल देणारे भाकीत वर्तवण्यात येते. या भविष्यवाणीवर शेतकऱ्यांचा अतुट विश्वास आहे. या भाकिताचा आधार घेऊन ते आपल्या पिकपाण्याचे नियोजन करत असतात. मातीच्या ढेकळावरून चार महिन्यांच्या पावसाचा अंदाज व्यक्त केला जातो. विविध धान्यांवरून आगामी हंगामातील पिके कसे राहतील, हे सांगण्यात येते. चारा-पाणीसाठी सांडाई, कुरडई, तर पुरी निसर्गाशी संबंधित राहते. करंजीवरून देशाची आर्थिक परिस्थिती सांगण्यात येते. भादली हे रोगराईचे, तर पान-विडा राजाच्या गादीचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. राजा म्हणजे पंतप्रधान. पान, विड्यात होणाऱ्या बदलावरून भविष्यातील राजकीय परिस्थितीवर भाष्य केले जाते. मसूर हे पीक परकीय घुसखोरीचे द्योतक आहे.

घटमांडणीचे भाकीत ऐकण्यासाठी विदर्भ, खानदेश, मराठवाड्यासह अनेक भागातून शेतकरी भेंडवळमध्ये मुक्कामाला येतात, या परिसरात हजारोंच्या संख्येने शेतकरी एकत्रित जमतात. शेतकरीच नव्हे तर बी-बियाणे कंपन्यांचे प्रतिनिधीही शेतकऱ्यांचा आगामी काळातील कल लक्षात घेण्यासाठी येथे गर्दी करतात. शेतकरी वर्ग घटमांडणीचे भाकीत घेऊन पुढील हंगामाची पेरणी काय करायची, हे ठरवत असतात. पावसाची महिनावार माहिती आणि पीक परिस्थितीचा अंदाजही वर्तवण्यात येत असल्याने निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांसाठी ही घटमांडणी आशेचा किरण बनली आहे.

घटमांडणीला कुठलाही शास्त्रीय आधार नसला तरी आजही परंपरेनं बळीराजाच्या मनातील महत्त्व कमी झालेलं नाही. भेंडवळची प्राचीन घटमांडणी परंपरा विज्ञानाच्या आधुनिक युगातही जपली जात असून, याच भविष्यवाणीविषयी शेतकऱ्यांमध्ये कमालीची उत्सकता पाहायला मिळते. घटमांडणीनंतर वर्तवलेली पाऊस, पीक-पाणी, राजकीय, आर्थिक भाकितं बऱ्याचदा खरी ठरली आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन समितीला निव्वळ ठोकताळे म्हणत असले, तरी शेतकऱ्यांचा भेंडवळ घटमांडणीवर दृढ विश्वास कायम आहे.

## संपादकीय....

### पुरवठा साखळी

पश्चिम आशियात तणावाची स्थिती असल्यामुळं काही भागात गॅस पुरवठा करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. भारतातील लपीजी पुरवठा सामान्य आहे. वाहनांसाठीच्या एलपीजीची मागणी वाढली आहे, विमानसेवा सुरु आहे, त्यामुळं सध्या तरी परिस्थिती नियंत्रणात असल्याचे दिसत आहे. पश्चिम आशियातील तणाव सुरू असूनही, भारतातील एलपीजी पुरवठा सामान्य आहे. ताज्या आकडेवारीनुसार, एका दिवसात ५३.५ लाखांहून अधिक घरगुती एलपीजी सिलिंडर वितरित करण्यात आले, जे बुकिंगच्या तुलनेत सामान्य पातळीवर आहे. यावरून हे स्पष्ट होते की, सामान्य ग्राहकांना सध्या गॅसच्या तुटवड्याचा सामना करावा लागत नाही. या कालावधीत, ३९००० हून अधिक पी-एनजी ग्राहकांनी चधझछ्ॠऊळप पोर्टलद्वारे आपली एलपीजी कनेक्शन्स परत केली. पाईपद्वारे गॅस पुरवठ्याच्या उपलब्धतेमुळे लोकांचे सिलिंडरवरील अवलंबित्व कमी होत असल्याचे मानले जाते. सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांची ऑटो एलपीजी विक्री एप्रिल २०२६ मध्ये (१७ एप्रिलपर्यंत) सरासरी ३०५ मेट्रिक टन प्रतिदिन इतकी झाली आहे, जी फेब्रुवारी २०२६ मधील १७७ मेट्रिक टन प्रतिदिन विक्रीपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे. यावरून ऑटो क्षेत्रात एलपीजीच्या मागणीत वेगाने वाढ होत असल्याचे दिसून येते. भारतीय ध्वज असलेला कच्च्या तेलाचा टँकर 'देश गरिमा' होर्मुझच्या महत्त्वपूर्ण सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे पार झाला आहे. ३१ भारतीय खलाशांना घेऊन जाणारा हा टँकर २२ एप्रिल २०२६ रोजी मुंबईत दाखल होण्याची शक्यता आहे. ही भारतासाठी एक स्वागतार्ह बातमी आहे, कारण हा मार्ग जागतिक तेल पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये भारतीय जहाजांवर झालेल्या गोळीबाराच्या घटनेवर भारताने तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. सरकारने इराणच्या राजदूतांना बोलावून या विषयावर तीव्र चिंता व्यक्त केली असून सुरक्षेची हमी मागितली आहे. तणाव असूनही, ज्या देशांची हवाई हद्द खुली आहे, तेथून विमानसेवा सुरू आहे. २८ फेब्रुवारीपासून या प्रदेशातून अंदाजे १०.९७ लाख प्रवासी भारतात दाखल झाले आहेत, यावरून असे दिसून येते की हवाई संपर्क व्यवस्थेवर अद्याप कोणताही मोठा परिणाम झालेला नाही. सध्याच्या परिस्थितीत भारतासाठी दिलासादायक बाब ही आहे की ऊर्जा पुरवठा आणि वाहतूक व्यवस्थेवर कोणताही मोठा परिणाम झालेला नाही. तथापि, सरकार परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे.

# धर्मांतरासारखे प्रकार अजिबात खपवून घेऊ नका! अंमलीपदार्थ विरोधात कठोर मोहिम राबवा; मुख्यमंत्र्यांचे पोलिसांना आदेश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : धर्मांतर साखरे प्रकार अजितबात खपवून घेऊ नका, नाशिकमधील धर्मांतर प्रकरणाच्या मुळाशी जावे तसेच अंमलीपदार्थ विरोधात राज्यभरात कठोर मोहिम राबविण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पोलिसांना दिले.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून गाजत असलेल्या नाशिक धर्मांतर आणि भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज गृह विभाग आणि राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा आढावा घेतला. पोलीस महासंचालक सदानंद दाते, गृह विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, राज्य दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख नवल बजाज, नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्यासह वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत फडणवीस यांनी नाशिक धर्मांतर, भोंदूबाबा अशोक खरात, परतवाडा, गोरेगाव अंमलीपदार्थ आदी प्रकरणांच्या तपासाचा घेतला आढावा आणि पोलिस विभागाला विविध सूचना दिल्या. नाशिकमधील अशोक खरात प्रकरणात पीडितांना संपूर्ण विश्वास द्या.या प्रकरणात कुणीही दोषी असो त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. न्यायालयात हे प्रकरण मजबूत कसे होईल, यासाठी भक्कम पुरावे गोळा करा. तपासात अपराधसिद्धी हा महत्वाचा घटक असला पाहिजे अशा सूचना त्यांनी दिल्या. त्याचप्रमाणे नाशिकमधील आयटी कंपनीतील धर्मांतरण प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी कठो भूमिका घेतली असून राज्यात कुठेही धर्मांतरासारखे प्रकार हे अजिबात खपवून घेऊ नका असे सक्त आदेश दिले.

नाशिक पोलिसांनी स्वत:हून हे प्रकरण उजेडात आणल्याबद्दल त्यांचे अभिनंतर करताना या प्रकरणाचा तपासही तितकाच दमदार झाला पाहिजे. यात असणाऱ्या सर्व पॅटर्नचा तपास करा, कोणताही अँगल तपासातून सुटू नये. तसेच या प्रकरणाच्या मुख्य सूत्रधाराचा शोध घ्या. राज्यात अन्य कुठेही असे प्रकार घडत असल्यास कठोर कारवाई करा असे आदेशही त्यांनी दिले.

काही दिवसांपूर्वी गोरेगाव येथे एका पार्टीत अंमलीपदार्थ सेवनाने दोन तरुणांचा मृत्यू झाला होता. या घटनेची गंभीर दखल घेत संपूर्ण राज्यात अंमलीपदार्थ विरोधात धडक मोहिम राबवा. अंमलीपदार्थ विरोधात मोठ्या प्रमाणात कारवाया करा. तरुणाईच्या भविष्याशी निगडित ही बाब आहे, त्यामुळे अशी प्रकरणे एकदम गांभीर्याने घ्या असे आदेशही फडवणवीस यांनी दिले. या प्रकरणात पीडितांचे समुपदेशन करून त्यांना तक्रार देण्यासाठी विश्वास दिला पाहिजे. यासाठी संबधित समाजसेवकांची मदत घ्यावी.

अमरावतीमधील परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणात पिडीतांना तक्रार देण्यासाठी विश्वास देणे आवश्यक आहे. त्यासाठी समुपदेशकाची मदत घ्या, सबंधित प्रकरणात समाज सेवकांची मदत घेऊन पीडितांना आधार देण्यावर भर देण्याच्या सूचनाही त्यांनी पोलिसांना दिल्या.




# मंत्र्यासोबत एकाच व्यक्तीला मंत्रालयात प्रवेश; मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशीची गर्दी टाळण्यासाठी आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी एखाद्या मॉलमध्ये होणाऱ्या गर्दीप्रमाणे मंत्रालयात गर्दी उसळते. मंत्र्यांच्या पाठोपाठ त्यांचे समर्थकही मंत्रालयात त्यांच्या गाडीतून किंवा त्यांच्या मागोमाग मंत्रालयात शिरतात. यामुळे सातव्या मजल्यावरील बैठकीच्या समिती सभागृहाबाहेर होणारी झुंबड रोखण्यासाठी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी कडक निर्बंध लादले आहेत. मंत्रिमंडळ बैठकीवेळी मंत्र्यांसोबत केवळ एकाच व्यक्तीला प्रवेश दिला जाणार आहे.

मुख्य सचिवांनी सर्व मंत्री कार्यालये आणि विभागांना स्पष्ट निर्देश दिले आहेत. मंत्र्यांची भेट घेणे किंवा मतदारसंघातील प्रश्न मांडण्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्रालयात अनेकजण उपस्थित असतात. बैठकीनंतर मंत्र्यांना भेटण्यासठी खूप गर्दी होते. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री, राज्यमंत्री, मुख्य सचिव, अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, यांच्यासाह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित असतात. याशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीला मंत्रिमंडळ बैठकीत उपस्थित राहता येत नाही. तरीही मंत्रालयात खूप गर्दी असते. त्यामुळे कामकाजात अडथळा निर्माण होतो.

हे रोखण्यासाठी मंत्र्यांसोबत त्यांच्या कार्यालयातील केवळ एका व्यक्तीलाच मंत्रिमंडळ सभागृहापर्यंत प्रवेश मिळणार आहे. याबाबत सर्व मंत्री आणि विभागांनाही सूचना देण्यात आल्या आहेत. जर इतर कोणत्याही व्यक्तीला बैठकीला उपस्थित राहायचे असेल तर त्यांना मुख्यमंत्र्यांची पूर्वपरवानगी घ्यावी लागणार आहे. त्याची कागदपत्रे संबंधित सचिव कार्यालय आणि संबंधित सुरक्षा अधिकाऱ्यास सादर करावीत.

मंत्रिमंडळ बैठक जर सह्याद्री राज्य अतिथीगृहात असेल तर फक्त आमदार आणि खासदारांना प्रतीक्षा खोलीत प्रवेश द्यावा. बैठक सुरू असताना आमदार खासदारांचे स्वीय सहायक यांना बैठकीच्या परिसरात प्रवेश देऊ नये. बैठकीआधी आणि बैठकीनंतर दोन तास मंत्रालयाच्या मंत्रिमंडळ सभागृह किंवा सातव्या व्या मजल्यावर कोणतीही बैठक आयोजित करण्यात येऊ नये, असे स्पष्ट निर्देश अग्रवाल यांनी सर्व विभागांना दिले आहेत.

# जि. प. प्राथमिक शाळा वागदरी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती विविध उपक्रमाने साजरी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/ एस. के. गायकवाड : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी तालुका तुळजापूर येथे भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी येथे मुख्याध्यापक बी.बी.सगर यांच्या मार्गदर्शनाखाली महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने विविध उपक्रम राबवून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. प्रारंभी सरपंच सौ. तेजाबाई शिवाजी मिटकर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महादेव वाघमारे यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी सामुदायिक रित्या संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले तसेच शालेय विद्यार्थ्यांची भाषणे झाली.यावेळी पाहुणे म्हणून बोलताना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे धाराशिव जिल्हा सचिव एस.के. गायकवाड म्हणाले की विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून किमान आठ तास अभ्यास करून आपला सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करावा.

यावेळी सहशिक्षक तानाजी लोहार, काळे सर,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महादेव वाघमारे, ग्रामप्र सदस्य मीनाक्षीताई बिराजदार सुरेखाताई यादव मुक्ताबाई बिराजदार अंगणवाडी कार्यकर्त्या पद्मिनी ताई पवार मदतनीस रूपाली जाधव अशा कार्यकर्ते पार्वती बाई बिराजदार ज्येष्ठ कार्यकर्ते कुंडलिक वाघमारे ग्रामपंचायत कर्मचारी सर्जेराव चव्हाण सह विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध उत्खनन रोखताना ताण; तोडगा काढण्याची महाराष्ट्र राज्य तलाठी संघ शाखा भिवंडी यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यात गौण खनिजाच्या संरक्षण व कारवाईदरम्यान महसूल कर्मचाऱ्यांवर वाढत असलेला ताण आणि त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनल्याने यावर तातडीने धोरणात्मक तोडगा काढावा, अशी मागणी भिवंडी तलाठी संघटनेने तहसीलदार अभिजीत खोले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महसूल विभागाकडे गौण खनिजाचे संरक्षण, उत्खनन व वाहतूक नियंत्रण, तसेच दंडात्मक कारवाईची जबाबदारी सोपविली असली, तरी कारवाईच्या वेळी केवळ ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकाऱ्यांनाच जबाबदार धरले जाते.




सरकारच्या नियमानुसार ही जबाबदारी महसूल, पोलिस व परिवहन विभागाची संयुक्त असताना प्रत्यक्षात समन्वयाचा अभाव असल्याची खंत संघटनेने व्यक्त केली आहे. महसूल कर्मचाऱ्यांकडे निवडणूक कामकाज, नैसर्गिक आपत्ती सर्वेक्षण, मदत वाटप, विविध अभियान,शासकीय योजना, राजशिष्टाचार, फेरफार, वसुली अशा अनेक जबाबदाऱ्या असताना अवैध गौण खनिज उत्खननावर प्रभावी नियंत्रण ठेवणे मानवी मर्यादेबाहेर जात असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. त्यातच रेतीमाफियांविरोधात कारवाई करताना कर्मचाऱ्यांना जीव धोक्यात घालावा लागतो. पोलिस संरक्षण केवळ कागदावरच असल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे. सरकारच्या वाळू धोरणानुसार संयुक्त पथकाद्वारे कारवाई प्रभावीपणे राबवावी, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. केवणी व काल्हेर रेतीबंदरावर सध्या ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकाऱ्यांची नियुक्ती करून दिवस-रात्र गस्त ठेवली जात आहे. मात्र, प्रत्यक्षात पोलिस कर्मचारी वेळेवर हजर राहत नसल्याने पथकातील कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. महिला कर्मचाऱ्यांना रात्री उशिरापर्यंत कोणत्याही पोलिस बंदोबस्ताशिवाय काम करावे लागते.

अवैध उत्खननाविरोधात कारवाई करताना कर्मचाऱ्यांना स्वतःचे वाहन वापरावे लागते, जेसीबीचा खर्च स्वतः करावा लागतो, यामुळे आर्थिक व मानसिक शोषण होत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे. काही दिवसांपूर्वी जप्त केलेल्या साहित्याच्या प्रकरणातही दक्षता पथकाने योग्य समन्वय न ठेवल्याचा दावा करण्यात आला आहे.

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते नवनाथ बण यांचा सांगलीत सत्कार: मान्यवरांची उपस्थिती




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेवक पदावर निवड झाल्याबद्दल भाजपाचे मुख्य प्रवक्ते व पत्रकार नवनाथ बण यांचा सांगली येथे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी नवनाथ बण यांना पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. त्यांच्या या निवडीबद्दल उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी इझ माझा च्या संपादिका सरीता कौशिक, सोलापूर महानगरपालिकेचे नगरसेवक मनीष केत, अशोक देढे तसेच संजय फुलसुंदर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार सोहळा पार पडला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भविष्यात डिजिटल मीडियाची भूमिका महत्त्वाची

## ना. चंद्रशेखर बावनकुळे: महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडियाचे अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कोविड काळात डिजिटल मीडियाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे भविष्यात डिजिटल मीडिया पाठीची शासन राहणार आहे . वर्तमानामध्ये आणि भविष्यामध्ये डिजिटल मीडिया माध्यमाचा विस्तार वाढला आहे व डिजिटल या नवीन स्तंभाची महाराष्ट्राला गरज आहे सर्व क्षेत्रात डिजिटल मीडियाचे महत्व अधोरेखित झाले आहे केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याची डिजिटल मीडिया प्रभावी मीडिया आहे. डिजिटल मीडियातील अनेक अडचणी काही समस्या तसेच आकस्मित निधीही द्यायचा आहे काही मागण्यांसाठी सकारात्मक आहेत. लवकरच त्याबाबत निर्णय घेऊ असे आश्वासन महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया, मुंबई राज्य अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळा संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट मिरज येथे पार पडला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉक्टर मैनिक घोष, सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र सुनील फुलारी, जिल्हा पोलीस प्रमुख संदीप घुगे, तसेच जनारिष्ट असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया राज्य संघटक व महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव, संजय फुलसुंदर, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील, संतोष मोरे, शुभम पाटील,आमदार गोपीचंद पडळकर उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते जिल्हाधिकारी डॉक्टर मैनिक घोष, सिंधुदुर्ग जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र सुनील फुलारी जिल्हा पोलीस प्रमुख संदीप घुगे एबीपी माझाचे कार्यकारी संपादक सरिता कोशिक, उद्योजक दिलीप कोटी भास्कर, प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ स्वीकृत नगरसेवक सोला-पूर महानगरपालिका मनीष केत, मुख्य प्रवक्ता भारतीय जनता पक्ष नगरसेवक नवनाथ बंद, ज्येष्ठ वैद्य डॉ. विनोद परम शेट्टी यांना







पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

ना. चंद्रशेखर बावनकुळे पुढे म्हणाली की आज ज्या ज्या मान्यवरांना पुरस्कार मिळाले आहे त्यांनी विकसित भारत, व समाज घडवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत पुरस्कारामुळे तुमची जबाबदारी वाढली आहे तुमच्यामध्ये क्षमता आहे म्हणून तुम्हाला पुरस्कार मिळाला आहे तुमच्या जीवनात चांगले काम करा त्यामुळे समाज सुधारेल, समाज सुधारणीमध्ये आता डिजिटल मीडियाचे महत्त्वा-ची भूमिका असणार आहे बावनकुळे पुढे म्हणाले की डिजिटल मीडियाच्या माध्यमातून सर्व क्षेत्रात उपयोग होतो डिजिटल मीडिया म्हणजे दुध-ारी शस्त्र आहे. ह्या कसोटीची काळ मन आहे व डिजिटल मीडियाच्या माध्यमातून चुकीची माहिती गेली तर कोणाची तरी आयुष्य उध्वस्त होऊ शकते व डिजिटल मीडियाची जेवढी क्रांती होईल ती गरज सरकारला आहे व डिजिटल मीडिया मोठा करताना काळजीही करावी लागणार आहे विकसित भारत गणित मीडियाच्या माध्यमातून चांगली माहिती दिली पाहिजे संजय भोकरे म्हणाले ज्या सन्माननीय व्यक्तींना आपण पुरस्कार देतो तो पुरस्कार कोणाच्या हस्ते घेतो हेही महत्त्वाचे असते आयुष्य छान व थोडे लहान आहे वेड्या लढण्यात छान आहे अश्रूच यार माझा माधुरी समान आहे काट्यातही फुलांची झुलती कमान आहे हवे ते घे उचलून दुनिया दुकान आहे कधी हसव लागतं तर कधी रडावं लागतं सुंदर धबधब्यासाठी उंचावरूनही पडावं लागतं त्यासाठी प्रयत्नही महत्वाचे आहे असे व्यक्तिमत्व नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आहे यांच्या हस्ते सर्वांना सन्मानित केले जात आहे व डिजिटल मीडियासाठी दोन कोटीचा निधी दिला तर त्यांच्या व्याजातून अनेकांना मदत मिळेल अशी मागणी ही नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली.

यावेळी डिजिटल मीडियातील काही पदाधिकाऱ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले व अतिशय नियोजनबद्ध कार्यक्रम पार पडला सोलापूर, लातूर ,मुंबई, पुणे, नांदेड, आधी जिल्ह्यातून डिजिटल मीडियाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## जवान रोहित परशुराम खनिकुडे यांना अखेरचा सलाम



**कुटुंबाचा आक्रोश**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जवान रोहित परश-ुराम खनिकुडे वय २७ हे जम्मू काश्मीर येथे कर्तव्यास असताना दिनांक १६/ ४ /२०२६ रोजी रात्री शहीद झाले होते.

त्यांचे पार्थिव आज गावी आणून त्यांच्यावर आज अंत्यसंस्कार करण्यात आले.

गावातून मिरवणूक काढून वंदे मातरम, अमर रहे,घोषणा देण्यात आल्या.

यांचे शिक्षण पहिली ते सातवी पर्यंत शिक्षण श्री कुमार विद्यामंदिर टाकळीवाडी , माध्यमिक शिक्षण श्री सरस्वती हायस्कूल टाकळीवाडी येथे झाले.

पुढील शिक्षण श्री दत्त कनिष्ठ महाविद्यालय कुरुंदवाड येथे शिक्षण घेऊन सन २०२० मध्ये बेळगाव येथे मराठा लाईफ इन्फंट्री मध्ये भरती झाले.

त्यांचे ट्रेनिंग बेळगाव येथून झाल्यावर त्यांना अरुणाचल प्रदेश, चीन बॉर्डर, व सध्या जम्मू काश्मीर येथे कर्तव्यास असताना त्यांचे निधन झाले. यांच्या पश्चात आई-वडील,भाऊ, भाऊज,असा परिवार आहे.


यावेळी शिरोळ तालुक्याचे आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, गुरुदत्त शुगरचे एक्झिक्युटीव डायरेक्टर राहुल घाटगे, भवानीसिंह घोरपडे सरकार, तसेच समस्त गावकरी, पंचक्रोशीतील नागरिक, महिला, आजी माजी सैनिक, सैनिक फेडरेशन सर्व सदस्य, पोलीस दल, शासकीय अधिकारी, गावातील सर्व तरुण मंडळ,मोठ्या संख्येने उपस्थित राहून मानवंदना दिली.

## लोटस इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी ऐश्वर्या ढोले ९८.२ टक्के गुणांसह प्रथम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळा (सीबीएसई) तर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत पंढरपूर येथील 'श्री विठ्ठल इन्स्टिट्यूट ऑफ प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन' संचलित, लोटस इंग्लिश स्कूलने संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे यंदाही आपल्या यशाची परंपरा कायम राखली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, विद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.

विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी ऐश्वर्या ढोले हिने ९८.२ टक्के गुण प्राप्त करून शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे




तसेच कुमारी शरयू देशमुख आणि कुमारी प्रणिती पवार यांनी प्रत्येकी ९५.६ टक्के गुण मिळवून संयुक्तपणे द्वितीय क्रमांक मिळवला. कुमारी जान्हवी हिलाळ ९१.६ टक्के गुणांसह तृतीय स्थानी राहिली आहे.

विषयनिहाय गुणवत्ता आणि विशेष प्राविण्य:

विद्यार्थ्यांनी केवळ एकूण टक्केवारीतच नव्हे, तर वैयक्तिक विषयांतही उत्कृष्ट कामगिरी केली आहे. माहिती तंत्रज्ञान (आय टी) या विषयात ऐश्वर्या ढोले हिने आणि मराठी विषयात धनश्री रणदिवे हिने पैकीच्या पैकी अर्थात १०० पैकी १०० गुण मिळवून विशेष प्राविण्य प्राप्त केले.

शाळेतील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे -

ऐश्वर्या ढोले: ९८.२ टक्के,
शरयू देशमुख: ९५.६ टक्के,
प्रणिती पवार: ९५.६ टक्के,
जान्हवी हिलाळ ९१.६ टक्के, आदेय अनुसे: ९१ टक्के,
अश्विनी गरड: ९० टक्के.

विषयनिहाय सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत- माहिती तंत्रज्ञान १०० पैकी १०० ऐश्वर्या ढोले, मराठी १०० पैकी १०० धनश्री रणदिवे, विज्ञान १०० पैकी ९८ ऐश्वर्या ढोले, इंग्रजी १०० पैकी ९८ ऐश्वर्या ढोले, हिंदी १०० पैकी ९७ प्रणिती पवार, सामाजिक शास्त्र ९६ ऐश्वर्या ढोले,९६, शरयू देशमुख, गणित ८९ शरयू देशमुख.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी.रोंगे, अध्यक्ष भिमराव रोंगे, उपाध्यक्ष हणमंत बागल, शाळेच्या प्राचार्या डॉ.जयश्री भोसले, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले.

**शिबिरामध्ये वेगवेगळ्या विभा विभागाच्या माध्यमातून एकूण ४०४ लाभधारकांना दिला लाभ**

## मोहा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी प्रतिनिधी/हनुमंत पाटुळे : कळंब तालुक्यातील मोहा येथे मोहा मंडळअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर टप्पा क्रमांक (१) चे आयोजन दि.१७ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा येथे सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत करण्यात आले होते. या वेळी १५ पेक्षा जास्त महसुली व इतर विभागाच्या सेवा या शिबीराच्या माध्यमातुन देण्यात आल्या आहेत. या शिबीराचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षलागवड व फित कापुन करण्यात आले.



या शिबिरामध्ये प्रलंबित फेरफार,अकृषिक एन.ए. तरतुदी बाबत मार्गदर्शन व सुधारणा, घरांसाठी पट्टे वाटप,ई मोजणी अर्ज, सातबारा मधील चुकांची दुरुस्ती, नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र, नवीन व्यवस्थापनानुसार सनद प्रक्रियेची माहिती, ग्रीस्टॅक आणि पी.एम. किसान नोंदणी, डिजिटल स्वाक्षरी चे सातबारा आणि आठअ उताऱ्यांचे वाटप, विद्यार्थ्यांसाठी दाखले वाटप, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनाबाबत च्या प्रकरणाचा निपटारा, भूसंपादन व अकृषिक परवानगी प्रकरणे, उत्पन्न रहिवासी आणि जातीचे प्रमाणपत्र, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूर करणे कमी जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्यावत करणे आदी. महसुली सेवा या शिबिरामध्ये देण्यात आल्या आहेत. या कार्यक्रमासाठी उपविभागीयअधिकारी गणेश शिंदे, तहसीलदार हेमंत ढोकले, नायब तहसीलदार गोकुळ भराडीया, समाज कल्याण सभापती विश्वास कोकणे, कळंब पंचायत समिति

सभापती प्रणिता चव्हाण, उपसभापतीपं.स.राज्यश्रीवरपे, मा.जि.प.सदस्य संदिप मडके, मोहाचे उपसरपंच बशारत मोमीन, जि.प.सदस्य रूपाली नागटिळक, जि.प.सदस्य जयवंत कुंभार, अनुराधा दिघे पं.स.सदस्य, सुवर्णा पाटील पं.स.सदस्य, विस्तार अधिकारी साळुंखे,महिला व बालविकास अधिकारी ए.बी. थोरात, महिला बालकल्याण प्रकल्प अधिकारी लक्ष्मण वाघमारे, मोहा मंडळ अधिकारी कल्पना मुंडे, ग्राम महसुल अधिकारी राधा भंगे, खामसवाडी ग्राम महसूल अधिकारी आरती देवकर, मंगरुळ ग्राम महसूल अधिकारी राहूल निकम,गणेश कुंभार, जयराज कुलकर्णी, डोंगरे,मोहा मंडळ अंतर्गत असणारे कृषी सहाय्यक बालाजी देशमुख, बापू काळे, डोंगरे, महसुल मंडळ मोहा अंतर्गत सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं सदस्य, मोहा मंडळातील विविध गावचे पोलीस पाटील, बि.एल. ओ. महसुल सेवक बालाजी फरताडे,अर्जून शिंदे, सुनील माळी, धनाजी देवकर, ग्रा.पं. शिपाई नाना शेंडगे, महादेव पायाळ व मोहा मंडळातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबीरामध्ये महसुल विभागासह भुमी अभिलेख,ग्राम विकास, कृषी, महिला व बालकल्याण, एस.टी. महामंडळ, आरोग्य, शिक्षण, आधार व सेतु सुविधा केंद्र व इतर मिळून १९ विविध विभागांचा सहभाग होता. वेगवेगळया विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते. या शिबिरामध्ये एकूण ४०४ लाभ धारकांना लाभ देण्यात आला. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## खामसवाडी येथे जगदंबा माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे खामसवाडी/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील जगदंबा माध्यमिक विद्यालयात समाजकल्याण विभागाकडुन अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप दि १७ एप्रिल२०२६ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमास पंचायत समिती सदस्या सौ सुर्वणा पाटील, जगदंबा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशोक शेळके, उपाध्यक्ष सुरेश पाटील, सहसचिव किशोर शेळके, रामराजे शेळके, रामभाऊ शेळके, शंकर तांदळे, सुनील पाटील, सुरेश यादव, शाम शिंदे, उपसरपंच दयानंद पाटील, शालेय समिती अध्यक्ष तुकाराम गांधले, सतीश माने, अमर शेळके, कुलदीप घावटे, भीमा नकाते, भारत मगर, सुनील पाटोळे, अर्जुन मगर, बाळासाहेब वनकळस, संतोष पाटोळे, मनोज पाटोळे, आबाराव पाटोळे व पत्रकार बांधव उपस्थित होते. या वेळी अनुसुचित जातीतील विद्यार्थी ऋषिकेश वनकळस, अपेक्षा मगर, पूजा पाटोळे, अर्चना मगर, मानवी पाटोळे, प्रतीक्षा पाटोळे, अंजली पाटोळे यांना समाजकल्याण कडुन मंजुर झालेल्या सायकल वाटप करण्यात आल्या. या वेळी मुख्याध्यापक सावंत एम.आर, गर्जे ए.व्ही,डिकले एस.एच, शिंदे बी.डी, केंद्रे जे.व्ही, जामदार बी.व्ही, मेटे उद्धव, पाटोळे आबाराव, सौ.पटोळे मॅडम आदी उपस्थित होते.

# अक्कलकोट नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा संपन्न, विकासाच्या अनेक निर्णयांवर शिक्कामोर्तब



## मागील सभांचे इतिवृत्त कायम करून प्रलंबित विकासकामांना मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट :- पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृह, अक्कलकोट येथे नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

सभेमध्ये शहर विकास, धार्मिक परंपरा, नागरिक सुविधा आणि जनहिताच्या विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. अनेक महत्त्वपूर्ण ठरावांना मंजुरी देत अक्कलकोटच्या प्रगतीला नवी दिशा देण्यात आली.

या सभेत मागील सभांचे इतिवृत्त कायम करून प्रलंबित विकासकामांना मंजुरी, दक्षिण महाद्वार व मुरलीधर मंदिर परिसरातील स्वागत कमानींना कै. कल्याणराव (बाळासाहेब) इंगळे प्रवेशद्वार असे नामकरण करण्यास मान्यता, खासबाग येथील चौकाचे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक असे नामकरण एकमताने मंजूर, अक्कलकोटचे महत्त्व जपण्यासाठी धार्मिक प्रत्येक गुरुवारी शहरातील मांसविक्री ऐतिहासिक पायाभूत बंद ठेवण्याचा निर्णय, शहरातील सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि सर्वांगीण विकासकामांना गती देण्याचा निर्धार करण्यात आला.

या सभेस मुख्याधिकारी रमाकांत ऋतुराज डाके, उपनगराध्यक्ष राठोड, विविध सभापती, नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अक्कलकोट शहराला आदर्श, स्वच्छ आणि विकसित शहर बनवण्यासाठी सर्व नगरसेवक एकत्रितपणे प्रयत्नशील असून अक्कलकोट नगरपालिका कडून दर गुरुवारी मास विक्री बंदी करण्याचे ठरविण्यात आले होते. मास विक्रीस काँग्रेसचे दोन नगरसेवक व शिवसेनेचे एक नगरसेवक विरोध दर्शविला आहे.

=> पंडित दीनदयाळ उपाध्याय सभागृह, अक्कलकोट येथे आज नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा कर्तव्यदक्ष नगराध्यक्ष श्री मिलन दादा कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

सभेमध्ये शहर विकास, धार्मिक परंपरा, नागरिक सुविधा आणि जनहिताच्या विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. अनेक महत्त्वपूर्ण ठरावांना मंजुरी देत अक्कलकोटच्या प्रगतीला नवी दिशा देण्यात आली.

=त्र सभेतील प्रमुख निर्णय:

मागील सभांचे इतिवृत्त कायम करून प्रलंबित विकासकामांना मंजुरी.

दक्षिण महाद्वार व मुरलीधर मंदिर परिसरातील स्वागत कमानींना कै. कल्याणराव (बाळासाहेब) इंगळे प्रवेशद्वार असे नामकरण करण्यास मान्यता.

खासबाग येथील चौकाचे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक असे नामकरण एकमताने मंजूर.

अक्कलकोटचे धार्मिक महत्त्व जपण्यासाठी प्रत्येक गुरुवारी शहरातील मांसविक्री बंद ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय.

शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि सर्वांगीण विकासकामांना गती देण्याचा निर्धार.

# गणेश नाईक विद्यामंदिर व कै. मातोश्री मलकावा हणमंतप्पा बिराजदार पाटील प्रशाला रत्नमंजरी सोसायटी येथे महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : गणेश नाईक विद्यामंदिर व कै. मातोश्री मलकावा हणमंतप्पा बिराजदार पाटील प्रशाला रत्नमंजरी सोसायटी जुळे सोलापूर येथे महात्मा बसवेश्वर जयंती साजरी केली.

सदरप्रसंगी दशरथ वडतीले जेष्ठ पत्रकार अध्यक्ष बुरुड समाज सोलापूर आणि सिद्धांत बाबरे शहर संयोजक विवेक विवेक विचार मंच, प्रीती उडाणशिव सल्लागार ( ITI ) आमने साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी भांजे सर, गंगाधर पाटील, दसगोंडा सर, नागेश कुंभार सर शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा बिराजदार मॅडम व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री शिवशरण अण्णा बिराजदार पाटील उपस्थित होते.

सदर प्रसंगी श्री दशरथ वडतीले सरांनी विद्यार्थ्यांनी गायलेले बसवेश्वराचे वचन ऐकून शाळेतील विद्यार्थ्यांचे कौतुक केले. तसेच नागेश कुंभार सरांनी आपल्या मधुर वाणीने बसवेश्वर महाराजांचे वचन सादर केले , सिद्धांत बाबरे यांनी आपल्या मनोगतामध्ये संविधानाचे महत्त्व या विषयावर भाष्य केले आणि संविधानाची उद्देशिकाची फ्रेम विद्यालयास भेट दिली. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांचे गोड कौतुक केले शाळेचा परिसर स्वच्छ विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले शिस्त शिक्षक वर्ग विद्यार्थ्यांना उत्तम




मार्गदर्शन करतात हे भाषणातून व्यक्त केले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार शिवशरण अण्णा बिराजदार पाटील यांनीही आपल्या भाषणातून महात्मा बसवेश्वर यांचे विचार आचार आणि आपल्या वचनातून दिलेले संदेश आजही आपण अनुकरण करतो आणि त्याप्रमाणे वागतो सदर प्रसंगी विद्यार्थ्यांचे गोड कौतुक केले शिक्षकांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कुमार हिरेमठ सर यांनी केले व आभार सिद्धेश्वर पाटील यांनी मांडले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षकांची सहकार्य लाभले

# पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात बसवेश्वर जयंती निमित्त मान्यवरांकडून अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : संत बसवेश्वरांचे कार्य सामाजिक समता, स्वातंत्र्य मानवता मूल्यांच्या प्रसारासाठी प्रेरणादायी आहेत म्हणून त्यांच्या कार्यापासून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी या उद्देशाने पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात संत बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले



**राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग सौ सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, सेमी इंग्लिश विभाग, प्राथमिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, जूनियर विभाग प्रमुख पुनम कोकळगी, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, दिगंबर जगताप यांनी संत बसवेश्वराच्या प्रतिमेस अभिवादन केले.

प्रारंभी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी प्रास्ताविक केले संत बसवेश्वर यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली अन्यायाविरुद्ध आवाज उठवला स्त्री पुरुष समतेला महत्त्व दिले म्हणून त्यांचे विचार समाज सुधारण्यासाठी मार्गदर्शक आहेत असे त्यांनी प्रास्ताविक करताना सांगितले आभार प्रा सौरभ भस्मे यांनी मानले कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक उपस्थित होते.

# श्री. आर. के. पालवी स्कूल वासिंद शाळेचा विराज बडे ब्राँझ पदकाचा मानकरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : बृहन्मुंबई सायन्स टीचर्स असोसिएशन आयोजित होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा इयत्ता ६ वी व ९ वी चा अंतिम निकाल आज जाहीर करण्यात आला असून त्यात श्री. आर. के. पालवी स्कूल वासिंद शाळेचा विराज बडे याने इयत्ता नववी मधून ब्राँझ पदकावर मोहोर उमटवली आहे.

बाल वयातील विद्यार्थ्यांच्या प्रज्ञेचा आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा शोध घेण्यासाठी दरवर्षी इयत्ता ६ वी व ९ वी साठी होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेचे आयोजन केले जाते.

सुरुवातीला लेखी चाचणी नंतर प्रात्यक्षिक परीक्षा व शेवटी प्रोजेक्ट सादरीकरण असे स्पर्धेचे स्वरूप असते.

विराजने मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील पाण्यावर सौर पॅनल फ्लोटिंग बसवून स्वच्छ ऊर्जा स्रोत निर्माण करणे व बाष्पीभवन कमी करणे. असा प्रकल्प सादर करून आपली बुद्धिमत्ता, चातुर्य आणि कौशल्याच्या बळावर तीनही स्तरांवर चुणूक दाखवत ब्राँझ पदकापर्यंत मजल मारली आहे.

मुंबईतील माटुंगा येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते रविवार दि. १२ एप्रिल रोजी समारंभपूर्वक त्याला प्रशस्तीपत्र आणि रौप्य पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

श्री आर के पालवी स्कूलचे फाउंडर श्री रवींद्र पालवी सर, वर्गशिक्षिका श्रीमती वैशाली टीचर, श्रीमती सकीना टीचर श्रीमती हाजरा टीचर व शाळेतील इतर सर्व शिक्षकांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केल्यामुळेच त्याला हे यश मिळवणे शक्य झाले.




**आजपासून श्रींच्या महानैवेद्यामध्ये आमरसाचा समावेश**


# अक्षयतृतीया निमित्त श्री रूक्मिणी मातेस अलंकार परिधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : हिंदू वर्षातील महत्वाचे साडेतीन मुहुर्तापैकी अक्षय तृतीया एक मुहूर्त आहे. हिंदू धर्मात या सणाला विशेष महत्त्व असतं. त्यानिमित्ताने श्री रूक्मिणी मातेस अलंकार परिधान करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

यामध्ये श्री रूक्मिणी मातेस सोने मुकुट वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंच पेटी तांबडी, जव मणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मी हार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोळ, सरी, कंबर पट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले.





तसेच परंपरेनुसार अक्षय तृतीया पासून वटपोर्णिमे पर्यंत श्रींच्या महानैवेद्यामध्ये शेवयाची खीर ऐवजी आमरसाचा समावेश करण्यात येत आहे. अशी माहिती प्रविणकुमार घम यांनी सांगितले.

# राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये अहिल्यानगर प्रथम पारितोषिक तर उपविजेतेपद वसईला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक सबऑर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशन (SE) कोकण प्रादेशिक विभाग आणि टेनिस क्रिकेट असोसिएशन महाराष्ट्र व नाशिक वतीने अंतर्मंडळीय राज्यस्तरीय टेनिस क्रिकेट स्पर्धाचे भव्य आयोजन नाशिक येथे मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत राज्यभरातून १२ जिल्हास्तरीय संघांनी सहभाग घेत स्पर्धेला रंगत आणली.

या स्पर्धेचा अंतिम सामना अहिल्यानगर विरुद्ध वसई असा झाला या अत्यंत चुरशीच्या अंतिम सामन्यात अहिल्यानगर जिल्हा संघाने विजेतेपद पटकावले, तर वसई संघाने उपविजेतेपद मिळवले. सर्व सामने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. महिला खेळाडूंसाठी आयोजित करण्यात आलेला मैत्रीपूर्ण सामना हा विशेष आकर्षण ठरला.



स्पर्धेचे नियोजन भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव व मीनाक्षी गिरी व महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी नाशिक जिल्ह्यातील असोसिएशनचे सचिव विलास गायकवाड यांनी उत्कृष्ट नियोजन करून स्पर्धा यशस्वी केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभि. श्रीनिवास बोबडे (अध्यक्ष, एस.ई.ए ) , प्रमुख पाहुणे, अभि. संतोष खुमकर (सरचिटणीस, एस.ई.ए.), अभि. अमोल भाकरे (संघटन सचिव, एस.ई.ए.), . अभियंता सुंदरजी लटपटे (मुख्य अभियंता, नाशिक परिमंडळ), अभियंता लक्ष्मण राठोड (माजी अध्यक्ष, एस.ई.ए.), अभियंता सूर्यकांत पवार (IPEF Patron) व अभि. किरण जाधव (प्रादेशिक समन्वयक, एस.ई.ए.) यांची उपस्थिती लाभली.

स्पर्धेचा समारोप बक्षीस वितरण समारंभाने करण्यात आला. बक्षीस वितरण राजेंद्र पवार, संचालक (मा. सं.), महावितरण यांच्या हस्ते पार पडला. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात SE संघटनेच्या कार्याचे व या स्पर्धेच्या उत्कृष्ट आयोजनाचे विशेष कौतुक केले तसेच खेळाडूंना क्रीडाभावना जोपासण्याचे आवाहन केले.

यावेळी त्यांच्या हस्ते विजेत्या अहिल्यानगर संघाला चषक प्रदान करण्यात आला, तर उपविजेत्या वसई संघालाही पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट खेळाडूंनाही विशेष पारितोषिके प्रदान करण्यात आली. उत्कृष्ट फलंदाज - अक्षय देशमुख, उत्कृष्ट गोलंदाज - योगेश पाटील, मालिकावीर - कृष्णा गोर्डे यायला मिळाल्याबद्दल यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

सदर कार्यक्रम अभि. सचिन पवार, अभि. ज्ञानेश्वर वाटपाडे व अभि. सुजित देशमुख यांच्या सह नाशिक मंडळातील एस.ई.ए सभासद यांनी परिश्रम घेत उत्कृष्ट नियोजन करून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. या स्पर्धेत पंच म्हणून विलास गायकवाड, धनंजय लोखंडे, दर्शन थोरात धनश्री गिरी, राजेंद्र सांगळे, अविनाश धनगर, सनि बलसाने,शुभम जगताप, सत्यम पांडे यांनी काम बघितले.